म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५२२



REFBK-0024515
REFBK-0024515

# आषाढधारा

शं.क.कापडणीस

सं. क्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 FEB 1986

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

प्रकाशक–
के. विजय अंबाडे
पारिजात पब्लिकेशन्स
ब्लॉक नं. ३,
५७६, शिवाजीनगर,
जंगली महाराज रस्ता,
पुणे ४११००४
दूरध्वनी ५२८८१/५४००८

© सौ. शकुंतला शंकरराव कापडणीस,
गुरुकुलनगर, नामपूर रस्ता, सटाणा (४२३३०१)
जि. नासिक

मुद्रक–
एस. आर. अग्रवाल
ज्ञानसरिता मुद्रणालय,
८/११, एरंडवणे,
पुणे ४११०००४

मुख पृष्ठ :
अनिल उपळेकर

मांडणी :
के. विजय अंबाडे

ब्लॉक छपाई :
व्ही. जोशी ब्लॉक मेकर्स
शनिपार
पुणे ३०

मूल्य : १० रुपये

प्रकाशन काळ : ऑगस्ट १९८४

संदर्भ काव्य
२५२२
२४५१५
२८।२।८५

तीर्थरूप कै. जिभाऊंच्या
स्मृतीस–

## ओवी माहेरी येते...

श्री. शं. क. कापडणीस यांची कविता खास जानपद भागात जन्मलेली आणि पोसलेली आहे. सटाण्यासारख्या शहरात आज ते प्राध्यापक असले तरी त्यांचे पूर्वायुष्य बागलाणातील ग्रामीण वातावरणात, शेतमळ्यांच्या सान्निध्यात गेलेले आहे. या वातावरणाचे दाट संस्कार त्यांच्या बहुतेक कवितांवर उमटलेले आहेत आणि ते हृद्य आणि आकर्षक आहेत.

शहरी नजरेला दिसणारे ग्रामीण जीवनाचे बाह्यांग पूर्वीच्या मराठी काव्यात प्रगट झालेले आहे ते पुस्तकाच्या झगझगीत वेष्टनासारखे किंवा फळाच्या रंगीत कवचासारखे होते. देखणे परंतु वरवरचे. आता खेड्यातील भावजीवन त्यातील सर्व सौंदर्यासह आणि आंतरिक सुखदु:खांसह, चहूकडून काव्यात व्यक्त होत आहे. कापडणीसांची कविता याच वर्गातील आहे. अशा कवितेला ओवी हा छंद सर्वात जवळचा व जिव्हाळ्याचा. बहिणाबाईंनी ग्रामीण ओवीचे लाघवी लावण्य आणि लवचिक सामर्थ्य मराठी वाचकांना दाखविले. कापडणीसांचेही ओवीवर प्रेम आणि प्रभुत्वही आहे. किंबहुना ओवीतच त्यांची कविता माहेरी आल्यासारखी सहजतेने वावरते. रेशमी धाग्याप्रमाण उलगडत जाणाऱ्या त्यांच्या ओवीत त्यांचा काव्यानुभव कसा बिनासायास स्त्रवत जातो याचा प्रत्यय अनेक ठिकाणी येतो. या कवितेत आर्त प्रेम आहे, कोमल शृंगार आहे, विविध नात्यातील भावबंध आहे आणि कोठे प्रचलित व्यवहारासंबंधीच्या तीव्र प्रतिक्रियाही आहेत. असे हे भावशील व्यक्तित्वाचा आविष्कार करणारे आणि अकृत्रिम शैलीत लिहिलेले काव्य. रसिकांना ते प्रिय होईल असा मला विश्वास वाटतो.

वि. वा. शिरवाडकर

(कुसुमाग्रज)

## ऋणात मी

' आषाढधारा ' हा माझा पहिला कवितासंग्रह. या माझ्या पहिल्या-वहिल्या कवितासंग्रहास कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब यांनी आशीर्वादांच्या ओव्यांची सौंदर्यलेणी चढवली. कवीवर्य वसंत बापट यांनी रंगारूपाचं दर्शन घडवून वात्सल्यपूर्ण स्वागत केलं. प्रा. व्ही. एम्. पाटील तथा काका यांनी अक्षय माया दिली. डॉ. मोहन माजगावकर आणि डॉ. सौ. शुभदा माजगावकर यांनी प्रोत्साहन देऊन त्यांच्या शुश्रूषा भवनात रांगू आणि रंगू दिलं. शिष्योत्तम श्री. दिलीप धोंडगे यांनी कडेखांदी मिरवलं. डॉ. आर. डी. पाटील, डॉ. व्ही. डी. पाटील, प्रा. शरद देशमुख यांनी चालण्या धावण्यावर स्नेहशील ध्यान ठेवलं. प्रा. एकनाथ पगार, श्री. यशवंत बापू अहिरे, श्री. एम्. पी. अहिरे, श्री. डी. के. कापडणीस आणि ऋणानुबंधातील अनेक सुहृदांनी अमोल साह्य केलं ' साहित्यायन–सटाणा ' च्या स्नेहांकित कवींनी, कवयित्रींनी आणि रसिकांनी कौतुकभरल्या शब्दांचं दान दिलं आणि शेवटी ' पारिजात प्रकाशन ' चे श्री. के. विजय अंबाडे यांनी ' पोज ' मध्ये बसवून त्याला रसिक वाचकांसमोर आणलं.
मी या सर्वांच्या ऋणात आहे.

शं. क. कापडणीस
सटाणा, जि. नासिक

# आषाढधारांचे स्वागत

या ना त्या निमित्ताने मी महाराष्ट्रात सारख्या हिंडत असतो. माझ्या भटकंतीत मला ठिकठिकाणी नवेनवे कवी भेटतात. गेल्या दहाबारा वर्षांत तर कवींची संख्या पुष्कळच वाढते आहे असा माझा अनुभव आहे. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये साहित्य-विषयक उत्साह शहरांपेक्षा थोडा अधिकच आहे. एका दृष्टीने ती गोष्ट मला स्वागतार्ह वाटते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची श्रीमंती वाढत चालल्याचा प्रत्यय अलीकडे मी वारंवार घेतो आहे. काव्यशास्त्रविनोदाचे आकर्षण असणारा समाज सुसंस्कृत असतो, आणि त्याची अभिरुची जसजशी उच्चतर होत जाते तसतसे त्याचे सांस्कृतिक वैभव आकर्षक वाटू लागते. परंतु केवळ उत्साहापोटी किंवा नावलौकिकाच्या हव्यासाने माणसे विपुल कविता प्रसवू लागली, तर त्या कवितेच्या भाराखाली वाचकांची विवेचन शक्ती चेंगरली जाईल आणि मग काव्य आणि काव्याभास यातले अंतर मिटत जाईल. यामुळे माझ्यासारखा माणूस द्विधा मनःस्थितीत असतो. नव्याचे स्वागत करावे पण ते डोळे उघडे ठेवून अशी जाणीव मनात घर करून राहते.

काही दिवसांपूर्वी मी नाशिक जिल्ह्यात सटाणा येथे गेलो असता प्रा. शं. क. कापडणीस यांनी मला आपल्या कविता दाखवल्या. त्यांच्या संग्रहाला मी प्रस्तावना लिहावी असेही सुचवले. ते मी मान्य केले. खरे म्हणजे असल्या कामात माझ्या-हातून चालढकल फार होते, पण या संग्रहाला योग बरा होता. त्यादिवशी गाड्या हळूहळू धावत असल्यामुळे वेळ सत्कारणी लावण्यासाठी मी कापडणीसांचे बाड चाळू लागलो. त्यातील कवितांच्या पहिल्या वाचनातच मला कवीच्या संवेदनशीलतेचे आणि त्यांच्या सौंदर्यलक्षी वृत्तीचे भान झाले.

श्री. कापडणीस उच्चशिक्षित आहेत. आणि महाविद्यालयात अध्यापक म्हणून ते काम करतात, तरीही त्यांचे जग मुख्यतः ग्रामीण आहे. त्यांचे प्रतिभाविश्व ग्राम-जीवनातल्या अनेक घटकांचे बनलेले आहे. मोकळ्या झाकळ्या आभाळाची त्यांना ओढ आहे. पहिल्याच कवितेत या गोष्टीची आपल्याला जाणीव होते. 'झाला उषःकाल राणी' या कुसुमाग्रजांच्या कवितेचे अनुकरण करण्याचा मोह कोणाही कवीला

पडेल; पण कापडणीसांनी तो टाळला आहे. त्यामुळे ' ऊठ राणी ऊठ राणी ' 'दिली कोंबडयाने बांग' दंव भिजल्या पहाटे', 'बगळयांची रांग' अशा साध्या सरळ आरंभाची कविता निर्माण झाली आहे. या कवीच्या कवितेत वेलीला ऊन गांजते; मेघमाला आणि वारा, गाईगुरांसारखे उधळतात, गरजतात, मेंदीपंखांचो पाखरे फांदीला झोंबतात, केळीच्या बांधावर वाटसरू उभे असतात, झाडे सोनाळतात, आंबराई यौवनात येते; खरोखर त्यांचे मन एका राजस पाखरासारखे इथे आणि तिथे बागडत राहाते, साहजिकच कलल्या चंद्राची कोवळी किरणे आणि पुनवेचे उत्फुल्ल चांदणे त्यांना भुरळ घालते. आषाढधारांचे तर किती आणि कसे कौतुक करू असे कवीला होऊन जाते. ग्रामजीवनाने भारलेल्या कवितेमधला शृंगार लावणीच्या अंगाने जावा हे स्वाभाविकच आहे. ' भैरूचे रान ', 'भर दुपारी' 'आण' अशा कवितांच्या गहिऱ्या शृंगाराच्या छटा वाचकाच्या मनात भरतात. काही रुजलेले संकेतही त्यांच्या कवितांतून डोकावतात; पण तो त्यांच्या प्रतिभेच्या साध्यासीध्या वृत्तीचा भाग असावा.

अश्रद्ध भक्तिभाव, उन्मुक्त शृंगार आणि वात्रटिका लिहिण्याइतका वात्रटपणा यांच्याबरोबर दुःखांचीही अनेक दर्शने या संग्रहात आपण घेऊ शकतो. आजच्या अभद्र जीवनातील अन्याय आणि विषमता त्यांना उद्विग्न करतात, मात्र त्यांचा निरास करणारी ध्येयसृष्टीही कापडणीस रंगवतात. बाजारू जीवनाची निर्भर्त्सना करताना त्यांचा राग उपरोधाच्या धारेमुळे तीव्र होतो. ते बहुश्रुत आहेत आणि त्यांचे पढीकपण लक्षणीय आहे, तरीही गांभीर्याने अथवा पांडित्याने त्यांच्या भावशक्तीवर मात केलेली नाही. या कवितेत उणीवा नाहीत असे नाही. त्यांची अधिक मीमांसा करण्याचे येथे प्रयोजन नाही. बारशाच्या दिवशी चिकित्सा फार करू नये आणि आशीर्वाद देताना उपदेश करू नये. स्वतःची आणि इतरांची कविता हेतुपुरस्सर पुन्हा पुन्हा वाचत राहाणाऱ्या कवीची समज आपोआपच प्रगत होत जाते.

कापडणीसांना त्यांच्या काव्यसाधनेत उत्तरोत्तर अधिकाधिक यश मिळो अशी शुभेच्छा मी व्यक्त करतो. आषाढधारांचे आगमन झाले की मन श्रावणातल्या ऊनपावसांच्या लपंडावासाठी उत्सुक होते. मग त्या मनाला सुगीची स्वप्ने पडू लागतात. कापडणीसांच्या कवित्वालाही भरगच्च सुगीची स्वप्ने पडतील आणि मराठीला नवी लेणी देण्याइतके वैभव त्यात निर्माण होईल एवढीच आशा या स्वागताच्या सोहळयात आपण करू या.

**वसंत बापट**

२५२२
२६५५१५
वगर्व्य २८।२।८५

## उठ राणी

उठ राणी उठ राणी
दिली कोंबड्याने बांग
दव भिजल्या पहाटे
नभी बगळ्यांची रांग

चांदरसात न्हाऊन
रात निघाली माहेरा
भरे लाल मळवट
घरी ठेवले भ्रतारा

सुखदेव आला वर
दूर वाजले रहाट
झाले दळणे शेजीचे
गेली संपून पहाट

काळ्या मेघातून निघे
सोन पावलांची वाट
घट घेतल्या नारींनी
गेला बहरून घाट

आली चैतन्याला जाग
झाले शांत रातगाणे
आता तुझेच राहिले
झोप- पुष्प उमलणे

भोई सहस्त्र घेऊन
सोनपालखी ग आली
हिमगो-या गालावरी
सखे फुटू दे ग लाली.

## आषाढ धारा

या आषाढाच्या पाऊस धारा
वाजत आल्या नभी नगारा
काळ्या हिरव्या गर्द डोंगरी
धुव्वाधार पिऊन वारा

या आषाढाच्या पाऊस धारा
खेळ खेळल्या ऊन-सावल्या
मातीमधल्या मातृत्वाला
दावून गेल्या चार वाकुल्या

या आषाढाच्या पाऊस धारा
कुठे वेचिती हिरवे पाचू
शेत मळ्याचा साज फाडूनी
कुठे पेरिती खारट आसू

या धारांचे असे बहकणे
कधी कुंदणे कधी धुंदणे
इंद्रधनूच्या रंगी खेळत
मोरपंखी भान हरपणे

या धारांसवे जीव बांधला
मातीमध्ये होऊन अंकूर
आषाढाची कथा ओलसर
कोरत आलो मृद्‌गंधावर

## नवस

आज अचानक कसे
गांजे वेलीला हे ऊन
आभाळाचा अवतार
झाला क्षणात भीषण

मेघमाला उधळल्या
वारा सुटला गर्जत
कडाडली वीजबाई
जशी काळाची कवंत

वृक्ष वादळात हाले
पक्षी झाले भयभीत
पानोपानी झंकारले
भविष्याचे भावगीत

दारापाशी नवसते
बांबुवरी नागवेल
' माझा भरला मांडव
नको करू मातीमोल '

## ग्रहण-ग्रस्त

जळत्या उन्हात झारी हाती घेऊन आहे
तो बागवान असूनी तो महाव्रती आहे
भेगाळ वसुंधरेला झडीची भूक आहे
करूणेचा प्राणसखा तो जलधार आहे.
शल्ये पाहून त्याची पापणी ओली आहे
आसवांच्या पावसात फकिर फिरतो आहे
वादळाशी झुंज द्याया तो सह्यकडा आहे
जाणीवांचा मुक्त राजा योद्धा रणांत आहे
उभा तम नांगरून तो दीपस्तंभ आहे
कर्मफुले वेचणारा तो कर्मवीर आहे
जखमांच्या पंढरीचा तो वारकरी आहे
चंद्रगंध पेरतांना बेहोष होत आहे
एकच मानवधर्म मित्र त्याजला आहे
तो मित्र मात्र आमुचा ग्रहण-ग्रस्त आहे.

## सजवलंच पाहिजे

क्रांतीच्या गर्भाला पुन्हा मिळाली ऊब
आणि अंकुरला त्याचा उन्मेष
फुललेल्या काटेरी फुलांना
हाकारतय हे कोल्ड क्रांतीफूल.
आज पराभवाच्या खांद्यावरून
गुलाबी गुढी मिरवत जाईल
रूतलेल्यांना वर काढण्यासाठी,
तेव्हा नवा कंदील प्रकाश
उधडत जाईल शल्य
अनेक वर्षांचे अडाणीपणाचे.

दंगल पेटवून ' राखेतून उठा '
हे सांगण्यापेक्षा
' बंद जाणीवांचे विहंग मुक्त करणे '
हा जीवनधर्म रक्ताळला पाहिजे
अंधाराचा कण नि कण वेचून
पेटवल्या होळीत टाकला पाहिजे

पांढऱ्या राणीजवळ टाहो फोडला
क्रांती फुल्यांनी
पण पट्टीपुरतं सुद्धा मिळालं नाही
आता युगानं देऊ केलं
शिलंगणाचं सोनं
पंचांग न पाहता वाटलं पाहिजे
पहाडावरचे थर दूर सारता सारता
हाती लागलं एखादं कैलासलेणं
तर संस्कृती संगीताचे बोल

दगडांमधून निनादतील
आणि सांगतील सर्वांना
नव्या सामर्थ्याचे यशोगान.

त्यासाठी हरेक बंदीपर्यंन्त
हुंगत गेलंच पाहिजे
आणि—
फाटकं चित्र नव्यानं सजवलंच पाहिज!

## गंधवेल

पौर्णिमेच्या धुंदरात्री
पाहिली मी तुझी स्वप्ने
बेहोषीत रंगलो मी
सागराच्या संगतीने

वचनांच्या ओंजळीने
किती दिले नि घेतले
सागराला येता लाट
डोळे तुझे अंधारले

ध्यानी ठेव अंधाराला
लटकतो सोनहिरा
भेट दिल्या साडीवर
माझ्या काळजाचा चिरा

चिरा तोडला फोडला
तुझ्या मायावी प्रेमाने
आता कशाला आठवू
तुझी भरली लोचने

झाल्या जखमांना आता
नको कशाचेही तेल
तुझ्या ठिकाणी आणली
घरची मी गंधवेल.

## वाटचाल

सूर्य रक्तवर्ण होऊन
बिछान्यावर पडला—तोच
रात्रीला काळोखाचे कारंजे फुटले.
काळी कांबळ लपेटून
रात्र आता चांगलीच घुमू लागली
तेव्हा त्याने सकाळी उडविलेले घोषणांचे पक्षी
त्याच्याच थडग्यावर येऊन बसले
घोर अंधारात.

आता त्याला पडू लागली स्वप्ने,
ही स्वप्नील अभिलाषेची कुत्री
रातभर हाडे चघळीत होती
दात कर्र कर्र वाजवित होती
बरीच रात कुरतडून झाल्यावर
कावळे ओरडले
तशी त्याची झोपमोड झाली
अनेक दिवसांपासून जपून ठेवलेल्या
त्याच्या मायावी शिल्पाचा त्याला
आज असह्य कुबट वास आला
तो उठला –
आणि सरळ अंधारातच
गंगेकडे वाटचाल करू लागला.

## सारे ऊन जल व्हावे.

असे मिळावे चैतन्य
सारे दुःख पिता यावे
असे मिळो मनोधैर्य
सारे रिपू हाती यावे
असे मिळो ज्ञानचक्षू
सारे शिव दिसू यावे
अशी लाभो ईशभक्ती
सारे समर्पिता यावे
असा दाता आठवावा
सारे मोह नष्ट व्हावे
अशी गीते गळा यावी
सारे सूर कंठी यावे
अशी पडावीत स्वप्ने
सारे नभ हाती यावे
असे लाभोत सोबती
मोहरून मन यावे
कुठे हुंदका ऐकता
काळजाचे पाणी व्हावे
पाणपोई मांडतांना
सारे ऊन जल व्हावे.

## दर्यावर

नाव टाकली दर्यात
नावाडी आला रंगात

नाव चालली वेगात
दर्या आला ग खुशीत

दर्या नाचतो तालात
चंद्र हसतो गालात

लाटा खेळती ढंगात
जो तो आपुल्या नादात

नावाडी आला धुंदीत
नारी घेतली मिठीत

आली पुनव मस्तीत
दर्या धावला जोसात

वारा भरला शिडात
चंद्र फुटला काठात.

## कसी मी

सांज झाली गाई परतल्या
गाय कशी मी बांधू ग

चरून आली कपिला गाय
दूध कशी मी काढू ग

दूध काढता साडी भरली
नदी कशी मी जाऊ ग

धूत असता साडी चिरली
शिंपी कशी मी शोधू ग

शिंपी चावट चह्राडी केली
कुणा कशी मी सांगू ग

सासू मेली तोंडाळ वाचाळ
बोल कशी मी झेलू ग

साजण माझा येईल घरा
त्याशी कशी मी बोलू ग.

## ऊन झेल्या

मेंदी पंखाचे पाखरू
गेले फांदीशी झोंबून
सोनपिवळा मुखडा
गेला भुरळ पाडून

पाही रोज फांदी-फांदी
बावरलं वेडं मन
बाजारात वाळूवर
विके दाळचा पवळण

एका पावतीच्या मिषे
ऊन खेळे अंगभर
गेल्या सावल्या पल्याड
लोक वाटा वाटांवर

ओल्या वाळू काठावर
सांजखेळी गवळण
ऊनझेल्या कन्हैय्याला
गेली ओठात घेऊन.

## तेवढा अग्नी परत कर

त्याचं अग्निफूल बेवडेबाज होऊन
नशाबाजांच्या बाजारात
विकलं गेलं–
तेव्हा आकाशाचा एक अश्रू टपकला.
छिद्राळ प्रतिष्ठा पांघरून मिरवला
तेव्हा मातीला गहिवरून आलं.
लाचार हात भरदिवसा पुढे झाले
तेव्हा पेटती वावटळ उठली
सगळं उधाण उधळत
त्याला म्हणाली,
तुला महाभूतात चुकून दिलेला अग्नी
तेवढा परत कर.

अग्निकण गोळा करणाऱ्या
सूर्याची आग पिऊन
पेटणाऱ्या वीराला
तो द्यायचा आहे.
आकाशाचा संदेश घेऊन
रक्ता रक्तातल्या अंधारगुहांत
मन्वंतराची स्वप्ने
तो पेटवणार आहे
उद्याच्या संस्कृतीसाठी.
म्हणून सांगणं आहे–
तेवढा अग्नी परत कर.

## आता सांगवत नाही

आलं आभाळ भरून
झाली टपटप सुरू
केळीच्या ग बांधावर
कोण उभा वाटसरू

चला जल्दी घराकडे
वारा सोसवत नाही
ओटी पोटातली कळ
आता सांगवत नाही.

## यौवनगंधा

चांदणं टिप्पूर पडलय बघ
अंधार गजरा सोडून ठेव
दारी आकाशकंदील बांधलाय ग
अंगणात पणती आणून ठेव.

चाफा कसा डवरलाय बघ
गंध त्याचा बांधून ठेव
गंधभारात फुलायचे असते
यौवनगंधे ध्यानात ठेव.

# झाडे

आकाश मातीशी
जीव जखडून
गर्जून उठली
झाडे वेडावून

घोषणा तयांच्या
नभाला भिडल्या
ठिणग्या गर्भस्थ
सर्वत्र पेटल्या

झाडांच्या पानात
वाजे रणभेरी
संग्राम खेळाया
सिद्ध समशेरी

वाऱ्याच्या जोसात
फांद्या कडाडती
खोडा खोडातून
सुरुंग पेरती

झाडांच्या बुंध्यात
आगीचे ओहोळ
रानच्या धगीने
फुटले मोहोळ

प्रकाश शोधाया
झाडे पिसाटली
काळोख हाकाया
सर्वांगी चेतली

ग्रंथालय ठाणे
ग्रं. क्र. ........
शाखा (स्थळ प्रत)

झाडे सोनाळली
कांबळ फाटली
आनंदी राजाने
साखर वाटली.

## गहिवर

हिरव्या पानी राहते
नवती मधली पोर
यौवनात आंबराई
सावलीत नाचे मोर

पडे सनईचा सूर
कोण्या लग्नाचा श्रवणी
अंगी हळद माखून
आली फांदीच्या अंगणी

'शुभ मंगल' सोहळा
दाटी पाहुण्यांची झाली
वधू दंग निळया स्वप्नी
फौज पाखरांची आली

परि हाय; झाले काय !
राघू उंडरला राती
चोच वर्मी मारूनिया
डागाळली कुलवती

कन्या पतित व्याकूळ
रडरडे दिनभर
घेई भूवरी झोकून
दुःखे त्यागुनिया घर

झाली चिवचिव सुरू
पानोपानी गहिवर
मुक्या जखमांची कळ
पसरली रानभर

## जखमा

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी'
म्हणून लावलीत चार झाडे
हिरवीगार लुसलुशीत
महाद्वाराजवळ.
पाण्याच्या घागरी लांबवरून
डोक्यावरून आणताना
कितीदा मस्तक भणभणून गेलं
पण सगळं सोसलं
सर्वांच्या उज्ज्वल उद्यासाठी !
पण कोणी अनामिक
एक क्षण रिझवण्यासाठी
फुंकतो विडी पाय ताणून
अन् फेकून देतो तशीच ठिणगीसहीत
तेव्हा आगीच्या भुकेत जळून गेलीत
वृक्षवल्ली उद्याच्या उज्ज्वलतेसह.
तेल शोधायला
वेदना मात्र मागे उरल्या
भळभळत्या जखमांसह !

# आम्ही व तुम्ही

शिवार आमचं
कुरण तुमचं
गायी म्हशी आमच्या
डेऱ्या तुमच्या
आम्ही पायथ्याशी
तुम्ही माथ्यावर
दाराशी आम्ही
पंगतीत तुम्ही
आम्ही स्वस्त
तुम्ही महाग
धुळीत माखतो आम्ही
गुलाल तुमच्या माथी
रक्ताळतो आम्ही
गुलाब तुमच्या कोटावर
डंख आमच्या गाली
मधु तुमच्या जिव्हेवर
आम्हाला निखारे
तुम्हाला एअर-कूलर
आम्हाला दगडमाती
तुम्हाला माणिकमोती
'कालिया' आम्ही मारतो
फोटो तुमचे 'ताज' समोर
खिंड आम्ही लढवतो
तुमची मात्र मेण्यातून मिरवणूक
आम्ही फाटलेलं अस्तरतो

तुम्ही फाडून अस्तरता
तसं तुमचं आमचं भांडण नाही
पण म्हटलं तर जमतही नाही
प्रथम भेटलात तेव्हा योगी वाटलात
पण निघालात सर्व भोगी
आता–
तुम्ही पेटवलीच आहे शेपटी
तेव्हा तुमच्या लंकेचं अंत्यदर्शन घ्या
कारण उद्या तिची फक्त राख असेल !

## हलकेच कुशीवर वळतो

कलत्या चंद्राची कोवळी किरणे
धवल मेघांच्या काळजातून झिरपत
जेंव्हा खिडकीच्या जाड काचांना
मंतरतात
आणि शिरतात माझ्या मच्छरदाणीमधून
तेव्हा त्या चंदेरी किमयेने
सारा देहच मोहरून जातो
आणि त्या गाळीव चांदण्यांत
मी हलकेच कुशीवर वळतो.

## ओटा

अलीकडेच
तिने मातीचा ओटा
सिमेंट लावून पक्का केला,
पण आतली मातीच फुगली
आतल्या ओलीनें
तेव्हा ओटाच कलथून पडला
माती फुगते
सिमेंट फुटते
त्याने ओटाही ढासळतो
हे तिला आज कळले
आता ती—
मातीचा ओटा बांधून
शेणाने सारवते आहे.

## एक राजस पाखरू

एक राजस पाखरू
प्रीत बंधात बांधले
शांत नदीच्या किनारी
हिर्व्या पानात ठेवले

डोळे फिरवी पाखरू
त्याच्या पंखात भिंगरी
जाई घेऊन गिरकी
कधी भरल्या बाजारी

गेले स्वप्नील राजस
घ्याया नभावर नीज
तेथे पाहिली तेजाळ
वीज पाखराची शेज

पंख शिणले पाखरू
आले नदीच्या किनारी
तेथे पाहिला शोकार्त
प्रीत भुकेला मापारी

झाली जेव्हा सांजवेळ
झाले पाखरू बावरे
भोळ्या साजण कुशीत
गात स्वतःला सावरे.

# जाळीत पाखरू

दिन मावळला
वासरे सुटली
गाय पान्हावली
सांजवेळी

पक्षी जाती भूर्र
कानी येती सूर
जाणे त्यांना दूर
दिशांतरी

शेतात जोंधळा
भरली ग चांदी
नार ग आनंदी
परतली

तारांचा साजण
आला आभाळात
आपुल्या नशेत
पुनवेला

बागेला आंदण
फुलांचे गोंदण
भरात चांदणं
नदीकाठी

वैभव सृष्टीचे
कसे हे पांघरू
जाळीत पाखरू
अडकले.

## एक फिनिक्स

रक्तपेढीच्या पारध्याने
शर विंधिला नेंम धरून
तेव्हा घायाळ झाला एक कर्मयोगी पक्षी.
भरल्या रानात
भरला आर्त चित्कार
आणि रानातच निनादली
पक्ष्याची आकाशवाणी–
‘ इन्किलाब झिंदाबाद’च्या घोषणात
हजारो सलाम घेत
उजळून निघालेला, राखेतून उठणारा
हा फिनिक्स
आकाशझेप घेईल
तोवर तुझी राख झालेली असेल
पुन्हा कधीही न उठण्यासाठी ’

## सले आणि फुले

तुडविली आडरानी
अवसेच्या काळराती
वाट वादळ वाऱ्यात
होता अंधार सोबती

केले सुखांचे दफन
मोल शल्यांचे करून
काळसर्प वाटेवरी
होते फडा उभारून

कधी थांबलो डोळयात
हात हातात देऊन
मतलबी दुनियेत
गेली आसवे गळून

सुख-समयीचे प्रेम
दुःख समयी आटले
वाटले, मृगजळात
मन उगीच धावले

सवे घेऊन स्वामिनी
सोनमहाल बांधला
अंगणात पारिजात
जाईसवे सुगंधला

भेटले सुहृद काही
भार त्यांनी वाहिला
स्नेह चांदण्यात त्यांच्या
देह सारा मोहरला

कधी चावऱ्या दुःखात
मन माझे जेव्हा उले
संतवचने पिऊन
सले माझी झाली फुले

## अलीकडे

अलीकडे
मी तुमचा
तुम्ही माझे
असे गणित मांडू नये
मी तुमच्यासाठी
तुम्ही माझ्यासाठी
असेही कुठे सांगू नये
कारण–
माझ्यातला ‘ मी ’ तुमचा असतो
पण तुमच्यातला ‘ तू ’ आमचा नसतो
सत्ता, संपत्ती आणि सन्मान
यांच्या रिकाम्या पिशव्या भरण्यासाठी
तो ब्रुटससारखा
भटकत असतो
कधी अंधारातून
कधी प्रकाशातून
हातात सुरा घेऊन
आमचाच जीव घेण्यासाठी
तेव्हा ‘ मी ’ ने
‘ तू ’ च्या मायावी पाशात
न पडणे हेच बरे
कारण आता–
गजेंद्रमोक्षाचे दिवस संपले आहेत
कपाळमोक्षाचे दिवस बहरले आहेत.

# भेट

तुझ्या हातांचा आधार
माझ्या डोंगरी कडांना
वारा तुझा सावरतो
माझ्या फाटक्या शिडांना

तुझ्या श्रावण धारेशी
जीव बांधला रेशमी
कोंब अंकुरला पुन्हा
मोहरली माझी भूमी

तुझ्या डोळी दु:ख माझे
कधी चमके तेजाने
माझ्या दृष्टीत ओघळे
तुझ्या स्नेहाचे चांदणे

तुझ्या सजल गंगेत
आहे अभयाचे तारू
वाट चांदण्याची होते
दौडविण्या धैर्यवारू

तुझ्या लौकिकाला भार
गुलमोहरी फुलांचा
रणरणत्या उन्हात
रंग खुलतो सेवेचा

गजबज बाहेरची
तुला कधी न साहवे
तुझ्या चंदनी वनांत
धर्म धन्वंतरी आहे.

सेवा तिचे आहे नाव
जिला नाही बारा वाटा
व्याकुळल्या मृगेंद्राचा
काढिशी तू पायकाटा

पांघरलो स्नेहनभ
ऋणाईत कायेवर
बरसू दे जलधारा
हर्षू दे हा मनमोर

होते अंतरी कधीचे
उघडावी भावपेठ
हा कुंभ भावनांचा
देतो दीपावली भेट

## एक अस्त

मालवली चंद्रज्योत
दाटे अंधार आभाळी
गेली वाटेत लपून
श्रमराजाची सावली

उंबरठा चाळीशीचा
घाई घाई ओलांडला
चिरेबंदी महालाचा
सोनचिरा निखळला

जाई मोगऱ्याचा बाग
आज उन्हाने सुकला
चुडा सतीचा बिल्लोरी
कसा अवेळी पिचला

वृंदावन तुळशीचे
उन्मळले अचानक
टाकलेल्या अर्घ्यजळी
ओघळले कथानक

वृक्षवेली हंबरती
रडे मळ्यातली माती
अश्रुधारेत वाहती
पायवाटा, तृणपाती

एका–एका आठवाने
जाते अंग शहारून
ओझे स्मृतीचे, प्रीतीचे
कसे करावे जतन ?

## ‘घे’

एक पल्ला चालून आलीस
संसारवेल फुलवून घे
बाळराज कडेवर आज
स्वप्न पल्लव मिरवून घे
आता मस्तीची पुरे पेरणी
तण हरळीचे काढून घे
भात्यामधले नजरबाण
शिणगारासह आवरून घे
रुमाल घडी विटली आहे
सती शिळेवर धुऊन घे
चाल अजून हरणी आहे
वाघरान थोडं पाहून घे
चाळे उन्मादकसोड आता
स्तन सर्वांगाने झाकून घे
सभोवती लुटारू रावण
लक्ष्मण रेषा आखून घे
शब्दांचे हे विखारी वैभव
नव तू आई समजून घे.

## फुंकर

स्वत:चंच रक्त अंगावर सांडत
मेणबत्तीसारखा जखमी होऊन
स्वत:च जळत राहिलो
वाटलं –
गेलेले लाईटस् लवकरच येतील
मग मारील कुणीतरी फुंकर,
नंतर कळलं ......
वादळात दोन चार पोल उन्मळून पडले
तारा तुटल्या
सगळीकडे डीस्‌ऑर्डर आहे म्हणे
आता प्रवास
अनंताकडून शून्याकडे.

शून्यातून विश्व
शून्यातून शास्त्र
शून्यातून मानव
असं शून्याचं सूर्यसत्य गणित
तेव्हा शून्य होईपर्यंत
जळलं पाहिजे हे कळलं.

आता फुंकर मारणाऱ्यांचा
मी जाहीर निषेध करतो
कारण त्यांच्या फुंकरीत
ऑक्सिजन नसतो तर
कार्बनडॉय-ऑक्साइड असतो !

## नाती लांडग्यांचो

अंधारातल्या गुहेत शोधू तरी कुणाला
फुत्कार येथले आता ऐकू तरी कशाला

शरदात ग्रीष्मआग आभाळ पेटले येथे
कोवळ्या चंद्रिकेचा नाही प्रवास येथे

माजल्या वादळलाटा फाटली शिडे सारी
उरल्या आयुष्याची मागती भीक दारी

साऱ्याच भुजंगांनी वेढिले चंदनास
गेले गरूड सर्व कैलास शोधण्यास

झेलून फुलते निखारे आयुष्य जळून गेले
शापातून तयांच्या राखेत फिनिक्स आले

आभाळ वेदनांनी गोंदून टाकले मी
नाती लांडग्यांची तोडून टाकली मी.

## पराभव

नभांगणातल्या सात चांदण्या
ऋषिकुळात जन्मलेल्या, वयात आलेल्या
आणि तेजाळलेल्या
पहातो मी रोजच बाजेवर पडून.
शेजारीच मंद-मंद तेवणारा असतो ध्रुवतारा
तपस्वी बाळ ध्रुवाची आठवण देणारा
तो निश्चल त्यागी बाळ तपस्वी पाहून
अवकाशातील सारेच तेजमहर्षी
पळ काढतात, धावतात, फिरतात आणि गुप्त होतात
बाळ ध्रुवाशेजारच्या व्रतस्थ कन्याही
कधी दूर जातात तर कधी सलगी साधतात
या बालवीराने सर्वांचा पराभव केलेला असतो
तेव्हा मीही माझा पराभव मोजत असतो
रोजच बाजेवर पडून.

## आग ही पापीयांची

पायावरी जयांच्या ठेवला विनम्र माथा
वांझ निघाल्या गाई चाटून झाडल्या लाथा

भरल्या डाळींबाला कीड पोखरून गेले
गंधीत चाफ्यावरी कावळे विष्टून गेले

परसात प्राजक्ताची फुले तोडून नेली
काटयात कर्दळीला हसती दुरून वेली

भुरटया चोरटयांनी दिली पेटवून होळी
आमुच्या नैवेद्यांची घेतली भरून झोळी

स्वप्ने शापित झाली सोडू कसा कुठे मी
आग ही पापीयांची साहू कसा किती मी.

## भर दुपारी

भर दुपारी घडीभरी डोळा तिचा लागतो
पदर डोईचा भुईशी वाऱ्यासवे खेळतो
केस कुरळे कुंतल गालीं वेचती चांदणे
तंग चोळीला ताणती दोन जवान दिवाणे
गार झुळूक अंगाशी झाली पोटरी उघडी
शेज महाली पेटली वीज उधाण शेगडी
कसा दिलाचा दिलवर चैत्रगौर पाहतो
स्वप्नमयीला धराया धुंद पलंगी चढतो
भर दुपारी नशेत ज्वानी लुटाया सजतो
कसा अचानक पाहुणा दारी थाप मारतो.

# अंत

उन्हात रखरखणाऱ्या, मरगळलेल्या माळावर
उन्हातच तापत उभा
एक जुनाट विशाल वटवृक्ष
एकाकी आणि एकटाच.
दरवर्षीचे उन्हाळे–पावसाळे खाऊन
शिणलेला जीव त्याचा
तरीही जगण्याची उमेद होती.
त्या भयाण विस्तीर्ण माळावर
अनेकांना त्याचा आधार,
रात्रीच्या अंधारात
भुतांनाही त्याचाच आधार
म्हणूनच तर त्याचे नाव सर्वमुखी होते.
पशू–पक्षी, पथिक यांचा तो मित्र होताच
पण माळावरच्या सुसाट वाऱ्यालाही
थांबायला त्याचीच जागा होती,
उन्हाळ्यात झळाही तेथेच थंड होत
लांबवरून लोक त्याकडें बोट दाखवित.
लाहया फोडणाऱ्या उन्हातच अचानक
‘ रोहिणी ’ कशी तापली कोण जाणे
तिच्या वादळवारा पावसात
त्याचा चिंधीचोळा झाला
रान थरारले ऽ ऽ ऽ
नंतर निस्तब्ध शांतता……
तेव्हा ‘ रोहिणी ’ संपली होती, ‘ मृग ’ चिंतेत होता.

या जांभूळ झाडाखाली
कुणा भैरूची झोपडी
त्याने शेजारी बांधली
ढवळ्या बैलांची जोडी

उकळत्या उन्हामधी
चिंचबाईची सावली
प्रेमे वासरू चाटते
काळी कपिला गाऊली

केळ ओली बाळातीण
तिची हिरवट बाळे
बांधावर फुलारली
काळ्या बाभळीची फुले

लावणीच्या आंब्याखाली
माय लेकरा झोपवी
सारणीच्या काठावर
वारा वेलीस नाचवी

झाले भैरूचे भोजन
कांदा भाकर खाऊन
झाला ठायीच आडवा
राणी टाकी पांघरूण

वाट वेडावून गेली
दूर वाकडी होऊन
रान भैरूचे माध्यान्ही
उगा आले शहारून.

## उपाशी पांगले

नदीच्या किनारी
ज्वानी पेटली
वाजले घुंगरू
कनात तुटली

ठोकल्या तंबूत
वाळूच्या मंचकी
नाचली नर्तिका
उसली कंचुकी

पानाच्या धुंदीत
लावणी रंगली
इश्काच्या नशेत
नवती भिजली

पुसाच्या रातीचे
चांदणे टिप्पूर
वेचाया धावले
अधाशी चकोर

नयन सुजे तो
स्वप्नात रंगले
फुटली पहाट
उपाशी पांगले.

## अजून

साऱ्याच ह्या व्यथांना वाली न शेष कोणी
साऱ्याच काळरात्री गातात अजून गाणी

घाटामधील वळणे संपली ना अजूनी
माथ्यावरील वृक्ष मागतो अजून पाणी

सांगते चूल ओली विझल्या विस्तवास
ज्वाला निघून गेल्या स्मरते आता विराणी

वेचलेली फुले सारी निर्गंध का निघावी ?
वाटाच पिसाट झाल्या साधण्या ही पर्वणी

अवसेच्या अंधारात नाचती भुते सारी
उतरेल माज त्यांचा प्रकाश पावलांनी.

## प्रीत प्रसाद

नदीकाठी चांदण्यात
अशी कशी फसली ग
पिसाटलेल्या कोल्हयांनी
बोंब गावात केली ग

ज्वानीच्या हुरडयावरी
कोण पक्षी बसला ग
हिरव्या पीत पानांचा
सुकून गेला मळा ग

तेजाळल्या चांदणीला
दीठ कुणाची झाली ग
निशिगंधाच्या राणीची
शिकार कुणी केली ग

मधुघट फांदीवरी
रात्री कसा फुटला ग
कोण राघू झाडावरी
चोरी करून गेला ग

कशी अवेळी छेडता
वीणा हाती टिचली ग
स्वप्नांच्या रंगमहाली
वीज आज पडली ग

झाले गेले पोरी आता
विसरून जा सारे ग
' सत्य शिव सुंदर ' ची
ठेव उघडी दारे ग

जगी या न बावरता
काटा रूतला काढ ग
ऊन्ह् झळा निवल्या की,
प्रीत प्रसाद वाढ ग.

## मशाल

तू एक उत्तुंग माणूस असूनही
तुला हाव नाही मिरवण्याची
प्रदर्शनाची, वृत्तपत्रीय फोटोंची
आणि संगमरवरी दगडांची.
महाबोटी सारखा तू खोलवर
अभेद्य खडकांशी टक्कर देत
कधी सागरलाटा परत फेकत
छोटयांना मोठ्यांना लळा लावत
चालला आहेस नाकासमोर.

दिसतोस तसा तू सर्वत्र
सभामंडपी, लग्नमंडपी, कलामंडपी
त्या मंडपी कलीयुगीन कर्णांची नावे
वाजत असतात - गाजत असतात
तू मात्र तेव्हा गैरहजर असतोस
मग केव्हातरी, कुठेतरी, कुणीतरी
लंगोटीवाले, कांबळीवाले, काठीवाले
गाठतात - सांगतात कथा आणि व्यथा,
तुझ्यातला दडलेला तो माणूस
चटकन् जागा होतो, भानावर येतो,
विचारचक्रांना गरागरा गती देतो
बाहेरचे हात खिशात घुसतात
असेल त्याचा ठाव घेतात
मिळेल त्या गंगाजळीची ओंजळ
देतोस अनामिकाजवळ अंधारात
ही मानवता मशाल देऊन जातोस
तेव्हा तू अधिकच सुंदर दिसतोस !

## आता

मंडपाकडे जायची घाई आहे
आज असा रोखून पाहू नकोस
जुने रेशीम आता तुटत आहे
जवळपास उभा राहू नकोस
स्वारी मिरवत येत आहे
उगीच धडकन् वाढवू नकोस
प्रेम दिल्या घेतल्याची जखम आहे
तिला आणखी वाहती करू नकोस
वेदना उराशी जपून आहे
बांधली जखम आज सोडू नकोस
सूर तुझे, साथ तुझी, विरत आहे
अक्षय कुंकवाला अडवू नकोस
सप्तपदी करायची घाई आहे
तळ्याकाठची गाणी गाऊ नकोस
आता तोच माझा पतित--पावन,
हिरव्या काकणाला दृष्ट लावू नकोस.

## आण

आज फुलून आलीस
गंध जीवनी घेऊन
होऊन माझी नयना
सोन पाऊले लेऊन

भावस्पंदने वाढली
हात हाताला लागून
अंधाराचे घर माझे
गेले झणी उजळून

वाट वाळूतली तप्त
सोस लागला चालून
भेटे आज मखमल
तुझे केवडचाचे रान

अंधारातला मी शुक्र
तू गे चांदणी पहाट
घाल गळचामधी हात
दूर सारू तम दाट

नको आठवू गांधारी
नको तिचे सतीवाण
आज सूर्याचे घे तेज
कर मला त्याचे दान

महाकाव्य जीवनाचे
सांग संजय होऊन
लाडकी माझी मैना
हीच माझी तुला आण.

## आता

मंडपाकडे जायची घाई आहे
आज असा रोखून पाहू नकोस
जुने रेशीम आता तुटत आहे
जवळपास उभा राहू नकोस
स्वारी मिरवत येत आहे
उगीच धडकन् वाढवू नकोस
प्रेम दिल्या घेतल्याची जखम आहे
तिला आणखी वाहती करू नकोस
वेदना उराशी जपून आहे
बांधली जखम आज सोडू नकोस
सूर तुझे, साथ तुझी, विरत आहे
अक्षय कुंकवाला अडवू नकोस
सप्तपदी करायची घाई आहे
तळ्याकाठची गाणी गाऊ नकोस
आता तोच माझा पतित--पावन,
हिरव्या काकणाला दृष्ट लावू नकोस.

## आण

आज फुलून आलीस
गंध जीवनी घेऊन
होऊन माझी नयना
सोन पाऊले लेऊन

भावस्पंदने वाढली
हात हाताला लागून
अंधाराचे घर माझे
गेले क्षणी उजळून

वाट वाळूतली तप्त
सोस लागला चालून
भेटे आज मखमल
तुझे केवडयाचे रान

अंधारातला मी शुक्र
तू गे चांदणी पहाट
घाल गळयामधी हात
दूर सारू तम दाट

नको आठवू गांधारी
नको तिचे सतीवाण
आज सूर्याचे घे तेज
कर मला त्याचे दान

महाकाव्य जीवनाचे
सांग संजय होऊन
लाडकी माझी मैना
हीच माझी तुला आण.

# सर्पांच्या जगात

सर्पांच्या जगात
उघड्यावर मैदानावर
सर्वत्र सर्पंच सर्प
जेथे जातो तेथे सर्प
जेथे पाहतो तेथे सर्प
काही काळे, काही तांबडे
काही छोटे काही मोठें
सगळेच जीभा काढणारे
दात सांभाळून असणारे
हळूच कात टाकणारे
पुन्हा तजेला धरणारे
कोणी आयत्या बिळात घुसणारे
कोणी किडे-मुंग्या खाणारे
कोणी वारुळात राहाणारे
कोणी निर्भय संचरणारे
काहींचा धाकच मोठा
काहींचा धोकाच मोठा
काही सुस्त, काही मस्त
काही पोकळ दिमाखवाले
काही नेहमीच फुत्कारणारे
काही नुसते चावणारे
काही एकाच दिशेने चालणारे
काही मागेपुढे सोईने सरकणारे
काही रातराणीला आलिंगन देणारे
काही चंदनाला विळखा घालणारे

काही सुगंधाला चटावलेले,
काही साम्राज्यवादी
मिळेल तितके ओरबाडणारे
पोट फुटेस्तो खाणारे
ह्यांची दुनियाच न्यारी
ह्यांचे कायदे न्यारे
ह्यांचे हिशेब न्यारे
तरीही माणसाशी नाते सांगणारे
पंचमीच्या दिनी हमखास दूध पिणारे
सुवासिनींची पूजा घेणारे
पण यांचा कोणी एक बापदादा
खूप चांगला आणि सात्त्विक
ह्याने आख्ख्या धरणीचं ओझं
घेतलं आपल्या शिरावर,
नामशेष होऊ घातलेल्या जगतात
त्या शेषाचं दर्शन घ्यावं म्हणतो
त्याच्या मस्तकी
चार फुलं टाकीन म्हणतो
आणि
धरतीवरच्या साऱ्या लबाड छक्केबाजांना
समुद्रात बुडवून टाक
व नवी कोरी सात्त्विक—
माणसाशी माणुसकीचं
आणि वेदनांचं नातं सांगणारी
तुझी स्वत:ची जमात पाठव ''
अशी प्रार्थना करीन म्हणतो
तोवर प्रतीक्षा करीत
जगायचंय म्हणतो
यांना पहायचंय म्हणतो.

## आभाळ फाटले

उन्हात डोंगर
तापतो वरून
खेड्याला कुशीत
बसला घेऊन

नशीब फुटके
दुबळ्या खेड्याचे
बसले एकटे
बाजूला कधीचे

हिरव्या स्वप्नांचा
जळतो अंकूर
तापल्या धुळीत
सारेच भेसूर

गाईंची खिल्लारे
दूरदेशी गेली
गोपाळांची गाणी
आसवांनी ओली

वाकलेले वृद्ध
बसती एकत्र
चिलीम ओढिती
उदास सर्वत्र

एखादेच कुत्रे
मधून विव्हळे
पाराला लागून
उपाशी झोपले

खेड्यात विहिरी
तलाव आटले
काळ्या माऊलीचे
लावण्य संपले

बिचाऱ्या खेड्याचे
आभाळ फाटले
डोंगर कुशीत
म्हणून लपले.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२५२२
क्र. २४५१५
काव्य २८।२।८५
ग्रंथ शाखा

## कळत—नकळत

तू येतेस
कधी कळत
कधी नकळत
कळत येतेस तेव्हा –
तुझं मोरपिसं लावून स्वागत.
नकळत येतेस तेव्हा–
आकाशगंगेच्या तुला पायघड्या
तुझं कळत येणं म्हणजे
नुसत्या पदराला गाठी
स्वप्नील पाखरांना चाळवणं
मेघांनी झाकोळणं.
तुझं नकळतचं येणं कसं–
वळवाच्या पावसासारखं
भूमीचा कण-कण फुलवणारं
तडावलेलं मस्तक शांतवणारं
ताठरलेल्या गात्रांना अभय देणारं
म्हणून तुझं नकळतचं येणं-जाणं मोहरू दे
आणि जमलंच तर
अधून मधून थोडी
अधिक सवड काढून ये.

## आपणच तुफान होऊ

मन तडकलं
मस्तक भेगाळलं
विष्णूच्या अमृतकुंभाची
चोरी झाल्याचं ऐकून

कावळे झाले कलहंस
बगळे झाले राजहंस
यांनी तर मानससरोवरच
विकायला काढलंय

चारूदत्त गजाआड
तर शर्विलक रंगमहालात शय्येवर
काळोखाला लाथा मारताहेत—
वसुंधरांच्या आर्त आरोळ्या
तर पोथ्यांची पाने विस्कटताहेत
वृंदावनांचे जथे सर्वत्र
अशावेळी
तडफडणारं एक शालीन पाखरू
पुन्हा त्याच फांदीवर येऊन बसलं
आपलं घरटं आहे की नाही
ते पाहाण्यासाठी

पाठीवर मारलं
पोटावर मारलं
आता तर मनाच्या बुरुजावरच
सुरुंग पेरत सुटलेत
हे संस्कृतीचे वारसदार

जमीन उलावी तसं काळीज उलतंय
आणि शब्द विद्ध होतात
घायाळ जटायू सारखे,
हृदयस्थ जखमांना पडू लागलंय
एक स्वप्न वादळाचं, तुफानाचं
दृष्टीला दिसतात दाबाचे पट्टे
घराघरांच्या दिशेने सरकणारे

आता एक करू
तुफानाला राहाण्यासाठी
त्याला आपलं घर देऊ
आभाळाच्या गाभाऱ्यात
आपणच तुफान होऊ.

## मृगजळ

एकदा यथेच्छ पाणी पिऊन
हसलो तृप्तीने
तरीही कोरड थांबेना
दाह अवरेना
फूल फुलेना चाफा बोलेना
तेव्हा थोडं थांबलो
आणि विचारलं अंतहृदयाला
असं का होतं म्हणून
तेव्हा वारूळातील शहाणी मुंगी
काठावर येऊन
सांगू लागली,
वेड्या, तू जे प्यालास
ते जळ नव्हतं
मृगजळ होतं !

## गौरी शंकर

पुराणातला गौरी शंकर
गौरी स्नेहात उबत होता
नंदीवर डमरू वाजत
रमणी सुख भोगत होता
हिमालयाचा गौरी शंकर
गौरीविना गारठत होता
जपानकन्या भेटे क्षणैक
अंगअंग घुसळत होता

## मराठीचा प्रवास

नऊवारीतील शालीन मराठी
सहावारीत घसरली वरून
जख्खड म्हतारा बोलला जोरात
' भंगले आहे हिचे खानदान,'
मी चिडलो, म्हटले त्यावर
' बाबा, डोळे आता सत्वर मिटा
स्लीव्हलेस पोलकं, बेंल बॉटम
छान दिसतो जरी वाटे थिटा '

## गौरी शंकर

पुराणातला गौरी शंकर
गौरी स्नेहात उबत होता
नंदीवर डमरू वाजत
रमणी सुख भोगत होता
हिमालयाचा गौरी शंकर
गौरीविना गारठत होता
जपानकन्या भेटे क्षणैक
अंगअंग घुसळत होता

## मराठीचा प्रवास

नऊवारीतील शालीन मराठी
सहावारीत घसरली वरून
जख्खड म्हतारा बोलला जोरात
' भंगले आहे हिचे खानदान,'
मी चिडलो, म्हटले त्यावर
' बाबा, डोळे आता सत्वर मिटा
स्लीव्हलेस पोलकं, बेल बॉटम
छान दिसतो जरी वाटे थिटा '

## विरंगुळ्याच्या कविता

१

आळ्यातला एरंड
भर नवतीत आला
शेंजारच्या वेलीस
बोलावू लागला
वेलही अशी चावट
लगेच धावली
एका रात्रीत झाली
चार कळ्यांची माऊली

२

विहीरीवरचा पंप रुसला
दिली सोडून हवा
आणि म्हटला,
माझी माल्हण दाखवा
शेणमातीचा चुरा
जेंव्हा ओतला घशात
तेव्हा म्हटला, ' आज जाऊ द्या
पण उद्या तरी भेटवा '

३

गादीवरचा तक्क्या
गादीवरची उशी
दोघात भलताच
वाद सुरू होतो–
तक्क्या म्हणतो,
'मी मालकाचे ऐकतो'
उशी म्हणते,
'दोघांचा संवाद माझ्या साक्षीने चालतो'

४

काळा फळा पांढरा खडू
मास्तरने लिहिला 'ग' गडू
'ग' फळ्यावर वर्षभर राहिला
कारण मास्तर होता वेळकाढू.

## शीळ माझी

शीळ माझी
पाणीपित्या बैलांसाठी
शेपटी त्यांची उडवणारी
पाण्यावर तरंगणारी

शीळ माझी
तांबड्या पहाटेसाठी
गोठ्यात शेणात कालवलेली
उकिरड्यावर–
शेण टोपलं नेणारी

शीळ माझी
माझ्या परसबागेसाठी
हिरवी मिरची लाल टमाटा
यांचा शेजारधर्म सांगणारी

शीळ माझी
भिंतीवरल्या बाईसाठी
छातीवरच्या नवतीवर
उगाच घोटाळणारी

शीळ माझी
शीळवालीसाठी
घराबाहेर काढणारी
हिरव्या मऊ गवतावर
कानगोष्टी करणारी

शीळ माझी
माझ्यासाठी
ऐलतीर पैलतीर
खेळ मांडून गाणारी
गाण्यामधल्या शब्दांना
शीळ चारा देणारी
शीळ माझी,
शीळ माझी !

## श्रावण भादवा

भादव्याच्या उनामधी
श्रमयोगी आखऱ्यात
श्रावणाच्या पोटासाठी
गंगा भोगीच्या फेऱ्यात

लोंबे झोळी बाभळाला
मध्ये तान्हुले कण्हते
विळा चाले सपसप
माय घामात भिजते

छत्रीधारी मालकाची
सावलीत पापी शीळ
घाम भिजट करुणा
चक्रावते घननीळ

वादळली मेघमाया
उडविले छत्र काळे
माय लेकरा बिलगून
केले हृदय मोकळे

REFBK-0024515



श्री. शं. क. कापडणीस यांची कविता खास जानपद भागात जन्मलेली आणि जोपासलेली आहे.
या वातावरणाचे दाट संस्कार त्यांच्या बहुतेक कवितांवर उमटलेले आहेत आणि तें हृद्य व आकर्षक आहेत.
रेशमी धाग्याप्रमाणें उलगडत जाणाऱ्या त्यांच्या ओवीत त्यांचा काव्यानुभव विनासायास स्त्रवत जातो.
या कवितेत आर्त प्रेम आहे, कोमल शृंगार आहे, विविध नात्यातील भावबंध आहेत. कोठे प्रचलित व्यवहारासंबंधीच्या तीव्र प्रतिक्रियाही आहेत.
अकृत्रिम शैलीत लिहिलेले त्यांचे काव्य रसिकांना प्रिय होईल असा विश्वास वाटतो.

वि. वा. शिरवाडकर

(कुसुमाग्रज)